# नगरपरिषद कार्यालय,परंडा

## बसस्थानक रस्ता, ता.परंडा,जि.धाराशिव-४१३५०२

फोन नं:-०२४४७७(२३२०३८) ई मेल - comcparanda@gmail.com


---

**जाहीर निविदा प्रसिद्धीकरण**
**सन २०२५-२६ करीता**
**ई निविदा सुचना क्र. :-०२**

# कामाचे स्वरुप :

नगरपरिषद हद्दीतिल संपुर्ण मिळकतीना (इमारती व खुले भुखंड) प्रत्यक्ष मिळकतीवर जाऊन प्रत्येक मिळकतीला विशिष्ठ क्रमांक नोंदविणे, मिळकतीवर जाऊन प्रत्येक मिळकतीचे मोजमाप करणे, करण्यात आलेल्या मालमत्तेच्या प्रत्यक्ष सर्वेक्षणाचे संगणकीय अद्यावतीकरण करुन माहीती तयार करणे, कर मुल्यांकन प्रक्रिये करिता मदत करणे, कर मुल्यांकन प्रक्रिये करिता आवश्यक नमुन्यात माहिती प्रिंट करुन आवश्यक स्टेशनरी व बाईंडिंगसह पुरविणे इत्यादी कामाकरिता सहाय्य करणे, नगरपरिषदेस कर विभागाकरिता आवश्यक असलेली संगणक आज्ञावली पुरविणे.

**(निविदा प्रपत्र किंमत- ५,०००/- रु)**

# नगरपरिषद कार्यालय,परंडा

## बसस्थानक रस्ता, ता.परंडा,जि.धाराशिव-४१३५०२

फोन नं:-०२४४७७(२३२०३८) ई मेल - comcparanda@gmail.com

मा.मुख्याधिकारी, परंडा नगरपरिषद वतीने नोंदणीकृत व अनुभवी कंत्राटदारांकडून खालील कामाकरीता गुणवत्ता निकषद्वारेई –निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहे. इच्छुक निविदा धारकांनी आपली ई-निविदा http://mahatenders.gov.in, या संकेत स्थळावर ऑन-लाईन पध्दतीने निविदा फी व ईसारा रक्कम ऑनलाईन नेट बॅकींग सुविधेव्दारे भरणा करुन संपुर्ण अर्हता दस्ताऐवजां सह विहीत मुदतीत सादर करावी. निविदे संदर्भात संपुर्ण कामाचे सविस्तर विवरण, निविदा शुल्क, अटी व शर्ती तसेच नोंदणी व पात्रता निकष ऑनलाईन निविदा संचीकेत उपलब्ध करण्यात येत आहेत.

| अ.क्र | कामाचे नाव | बयाना रक्कम | काम करण्याचा कालावधी | निविदा प्रपत्र किंमत |
|---|---|---|---|---|
| १. | नगरपरिषद हद्दीतिल संपुर्ण मिळकतीना (इमारती व खुले भुखंड) प्रत्यक्ष मिळकतीवर जाऊन प्रत्येक मिळकतीला विशिष्ठ क्रमांक नोंदविणे, मिळकतीवर जाऊन प्रत्येक मिळकतीचे मोजमाप करणे, करण्यात आलेल्या मालमत्तेच्या प्रत्यक्ष सर्वेक्षणाचे संगणकीय अद्यावतीकरण करुन माहीती तयार करणे, कर मुल्यांकन प्रक्रिये करिता मदत करणे, कर मुल्यांकन प्रक्रिये करिता आवश्यक नमुन्यात माहिती प्रिंट करुन आवश्यक स्टेशनरी व बाईंडिंगसह पुरविणे इत्यादी कामाकरिता सहाय्य करणे, नगरपरिषदेस कर विभागाकरिता आवश्यक असलेली संगणक आज्ञावली पुरविणे. | ५०,०००/- | १२ महिने. | ५,०००/- |

**निविदेचा तपशिल :**

| अ.क्र | निविदेचे विवरण | सुरु दिनांक व वेळ | अंतिम दिनांक व वेळ |
|---|---|---|---|
| १ | निविदा प्रसिद्ध | १८ / ०५ /२०२६ | २५/०५/२०२६ |
| २ | निविदा कागदपत्रे डाऊनलोड | १८ / ०५ /२०२६ | २५/०५/२०२६ |
| ३ | ऑनलाईन निविदा सादर करणे | १८ / ०५ /२०२६ | २५/०५/२०२६ |
| ४ | तांत्रिक लिफाफा उघडणे | २७/ ०५ /२०२६ | नगर परिषद कार्यालय परंडा |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | आर्थिक लिफाफा उघडणे | सोयीनुसार | नगर परिषद कार्यालय परंडा |

टिप : कोणतेही कारण न देता एक अथवा सर्व निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार मा. मुख्याधिकारी यांनी राखुन ठेवलेला आहे.

-sd-

**मुख्याधिकारी**

**नगरपरिषद,परंडा**

**I) ई निविदा/लिफाफा पध्दतीसाठी माहीतीपत्रक व सामान्य अटी :**

ई-निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी पात्र/ इच्छुक निविदाकारांनी स्वत: www.mahatenders.gov.in या पोर्टलवर नोंदणी केली पाहीजे.

१) निविदा उघडण्याच्या दिनांकापासुन निविदेची वैधता ९० दिवस असेल. अपुर्ण निविदा रद्द करण्याचा अधिकार मा. मुख्याधिकारी राखुन ठेवत आहे.

२) कंत्राटीदारीला आपल्या कंपनीचे नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

३) निविदा प्रपत्रादाची किंमत व बयाना रक्कम ही निविदा अंतिम दिनांकापर्यंत ऑनलाईन जमा केलेली असावी. जमा केलेली पावती निविदा कागदपत्रासह जमा करावी.

४) बयाना रक्कम अयशस्वी निविदा धारकास निविदा प्रक्रीया पुर्ण झाल्यानंतर परत केल्या जाईल.

५) निविदेबाबत कोणतेही कारण न देता कोणतीही एक अथवा सर्व ई निविदा स्वीकारण्याचा तसेच रद्द करण्याचा अधिकार मा.मुख्याधिकारी परंडा नगरपरिषदने राखुन ठेवलेला आहे.

६) ई निविदामध्ये नमुद केलेले काम हे कार्यादेश मिळालेल्या दिनांकापासुन सहा महीन्यात करणे बंधकारक राहील. आवश्यकतेनुसार मा. मुख्याधिकारी यांना मुदतवाढ देता येईल.

७) कंत्राटाद्वारे यापुर्वी यशस्वीरित्या केलेल्या प्रकल्पाचे सादरीकरण मा. मुख्याधिकारी यांच्या समक्ष करणे आवश्यक आहे. जर कंत्राटाद्वारे केलेले सादरीकरण हे समाधानी नसल्यास निविदा भरता येणार नाही.

८) कंत्राटाद्वारे शासनाने त्यांच्याकरीता आकारण्यात आलेले सर्व कर, फी व इतर लागु देय वेळोवेळी भरलेले असावेत.

९) कंत्राटदाराने सर्व कामे मा. मुख्याधिकारी परंडा नगरपरिषद व्दारे देण्यात आलेल्या सुचना व नियमावलीच्या अधीन राहुनच पुर्ण करावीत.

१०) निविदा धारकास प्रस्तावित कामाबाबत माहिती नगरपरिषदच्या पुर्व परवानगी शिवाय वितरीत अथवा प्रकाशित करता येऊ शकणार नाही.

११) कंत्राटाद्वारे सादर केलेले दर हे जि.एस.टी व सर्व करा शिवाय असावेत.

१२) निविदे मधील विहित मुदतीत कामे पूर्ण केली नसल्यास मुदत संपल्यापासून पुढे होणाऱ्या विलंबासाठी प्रती दिवस दंड रक्कम रु. १००/- कंत्राटदारास आकारण्यात येईल.

१३) निविदाधारकाने खाली दर्शविलेल्या पद्धती प्रमाणे निवेदेसाठी कागदपत्रांचे स्कॅन करून ई-निविदेसोबत सादर करणे तसे माहितीसाठी प्रत सादर करणे गरजेचे आहे.

१४) नगरपरिषद कर संकलन विभागाव्दारे कर आकारणीच्या कामाबाबत वेळोवेळी केल्या जाणाऱ्या सुधारणा निविदा धारकाने वेळेत पूर्ण करून देणे बांधणकारक आहे.

१५) नगरपरिषदने वेळोवेळी कामाच्या स्वरूपात केलेले बदलानुसार निविदा धारकास काम करून देणे बंधनकारक राहील.

१६) कराराच्या सर्व अटी व शर्तीसह निविदाकारांशी परस्पर सल्लामसलत करुन मा. मुख्याधिकारी जास्तीत जास्त दोन वर्षासाठी मुदत वाढवू शकते.

१७) कामाच्या व्याप्तीमध्ये बदल करण्याचे अधिकार नगरपरिषदने राखून ठेवलेले आहे.

## II) **निविदा सादर करणे** :

सर्व निविदाकारांनी आपली निविदा सर्व कागदपत्रानीशी ऑनलाईन www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर भरावी.

## III) **निविदेनुसार करावयाची कामे व पुरवठा :**

नगर परिषद परंडा हद्दीतिल अंदाजे एकुण मिळकती नविन सर्वेक्षणाप्रमाणे ७००० मिळकती होण्याची शक्यता आहे. निवड झालेल्या निविदा धारकामार्फत प्रत्येक मिळकतिंना विशिष्ठ क्रमांक देणे, नगर परिषद परंडा हद्दीतिल संपुर्ण मिळकती (इमारती व खुले भुखंड) चे प्रत्यक्ष मिळकतीवर जाऊन मिळकतीचे मोजमाप घेऊन सर्वेक्षण करुन सर्वेक्षणाची माहिती तयार करणे, सर्वेक्षणा दरम्यान गोळा केलेल्या माहितीचे संगणक आज्ञावलीत अद्यावतीकरण करणे, जुना मिळकत क्रमांक व जुन्या करांची नविन करण्यात आलेल्या मिळकत सर्वेक्षणाशी जोडणी करणे, निविदा धारकाकडून काढण्यात आलेल्या प्रत्येक मिळकतीची डिजिटल फोटोची मिळकतीशी संगणक आज्ञावलीमध्ये जोडणी करणे, मिळकतीच्या सर्वेक्षणादरम्यान काढण्यात आलेल्या नकाशाचे डिजिटल नकाशे बनविणे. डिजिटल नकाशाची संगणक आज्ञावलीत मिळकतीशी जुळवणी करणे, नगर परिषदने किंवा शासनाने ठरविलेल्या करमुल्यांकन पद्धतीने करमुल्यांकन करुन माहिती तयार करुन देणे, सर्वेक्षणाव्दारे गोळा केलेल्या माहितीचे अद्यावतीकरण केल्यानंतर करमुल्यांकनाचे गुणांकन करण्याकरिता स्वंय संगणक आज्ञावली करण्यास सक्षम असायला पाहिजे. निविदा धारकाने नगर परिषदने सांगितलेल्या नमुन्यामध्ये माहिती प्रिंट करुन आवश्यक स्टेशनरी व बाईडिंगसह पुरविणे, कर विभागाकरिता लागणारी संगणक आज्ञावली पुरविणे इत्यादी कामाकरिता नगर परिषदला सहाय्य करण्याकरिता ई-निविदा मागविण्यात येत आहे.

नियुक्त करण्यात येणा-या निविदा धारकास परंडा नगरपरिषदचे मुख्याधिकारी यांनी दिलेल्या संबंधीत कामाबाबतच्या सुचना, वेळोवेळी देण्यात आलेल्या मार्गदर्शना प्रमाणे काम पुर्ण

केल्या जाईल. करारनाम्यामध्ये नमुद केलेल्या इतर सर्व नियम व अटी निविदा धारकास बंधनकारक असतील आणि कामाच्या व्याप्तीचा भाग असतील.

**अ) मालमत्ता कर विभागाकरीता करावयाची कामे :**

**१) मिळकतींना विशिष्ठ क्रमांक देणे :-**

I. नगरपरिषद हद्दीचा भौगोलिक नकाश तयार करण्याकरीता नगरपरिषद हद्दीमध्ये UAV Drone उडवून मालमत्तांचे व जमिनीचे हवाई छायाचित्र काढून नगर परिषद हद्दीचा भौगोलिक नकाशा तयार करून देण्यात यावा.

II. नकाशावर नगर परिषदची हद्द आखणी, कर विभागाकरिता प्रभागाची आखणी नकाशावर करुन देण्यात यावी.

III. प्रत्येक मिळकतीला क्रमांकन करण्याकरिता प्रत्यक्ष मिळकतीवर जाऊन प्रत्येक मिळकतीला विशिष्ठ क्रमांक देण्यात यावा.

IV. मिळकतीमध्ये ज्या मिळकती सर्वजनिक वापर, करमुक्त मिळकती, शासकिय, निम शासकिय, औद्योगिक, निवासी व अनिवासी इ. मिळकतीना सुद्धा क्रमांकन करण्यात यावे.

V. क्रमांकन करतांना मिळकतीची जुन्या व नविन मिळकतीची नोंदवही तयार करणे व प्रत्येक मिळकतींना नव्याने क्रमांकन करण्यात यावे.

VI. नविन नंबरची आखणी भौगोलिक नकाशावर करून प्रभाग दर्शक नकाशा व संपुर्ण शहराचा नकाशा तयार करून नगरपरिषदेस सुपूर्द करणे.

**२) मिळकतीचे सर्वेक्षण करुन माहिती गोळा करणे :-**

I. नगर परिषद हद्दीतिल मिळकतीचे (इमारती व खुले भुखंड) भांडवली मूल्य पद्धतीने प्रत्येक मिळकतीचे सर्वेक्षण करण्याकरिता नगर परिषदेस सहाय्य करण्यात यावे.

II. सर्वेक्षणामध्ये मोजमाप हे चौ.फुट/चौ.मी मध्ये घेणे.

III. सर्वेक्षण करतांना करमुल्यांकनाकरिता आवश्यक असलेली माहिती इमारतीचे मजले, बांधकाम वर्ष, बांधकामाची रचना, बांधकामाचे क्षेत्र, करपात्र क्षेत्र इ. माहिती गोळा करणे व प्रत्येक मिळकतीचे सर्वेक्षणाचे विवरण पत्र तयार करणे.

IV. प्रत्यक्ष मिळकतीवर जाऊन प्रत्येक मिळकतीचे डीजिटल फोटो काढणे.

**३) सर्वेक्षणाचे संगणकात अद्यावतीकरण व कर मुल्यांकनाकरिता साहित्य पुरवठा :-**

I. नगरपरिषदकडे कर विभागासंबंधित उपलब्ध असलेल्या माहितीचे अद्यावतीकरण करणे, करआकारणी करण्याकरीता नगरपरिषदने निश्चित केलेल्या वार्डाप्रमाणे व मिळकतीप्रमाणे आज्ञावली अद्यावत करणे करमुल्यांकनाच्या प्रक्रीयेकरिता निविदाधारकाच्या सहाय्याने करण्यात आलेल्या मालमत्ता सर्वेक्षणाचा डाटा मिळकतीचे मजले, बांधकाम वर्ष, वापर, बांधकाम क्षेत्रफळ, करपात्र क्षेत्रफळ, खुल्या भुखंडाचे क्षेत्रफळ इत्यादी माहिती संगणक आज्ञावलीत अद्यावत करणे.

II. नगरपरिषदद्वारे करमुल्यांकनाकरिता दरपत्रक किंवा भांडवलीमुल्य आकारणी करीता मुल्यांकन यादी पुरविण्यात येईल. याप्रमाणे भांडवली मुल्य पद्धत त्याप्रमाणे आकारणी करणे गरजेचे आहे.

करमुल्यांकनाच्या कामाकरीता निविदादारामार्फत संगणक आज्ञावलीत अद्यावतीकरण झाल्यानंतर मा.मुख्याधिकारी ने सुचविल्याप्रमाणे व नियमाप्रमाणे प्रत्येक मिळकतींची मिळकत कर आकारणी पत्रक डिजिटल मिळकतीचा नकाशा, मिळकतींचा फोटोसह कलर प्रिंट काढुन नगर परिषदला सुपुर्द करणे, नगर परिषदने सुचविलेल्या नमुन्यामध्ये प्रारुप कर मुल्यांकन यादी पुरविण्यात येईल.

III. नगर परिषदने दिलेल्या नमुन्यामध्ये मिळकत धारकांना सुधारित करमुल्यांकनाबाबत पुर्वसुचना नोटीसेस कलर मध्ये पुरविण्यात येईल. सुनावणीकरिता मिळकत धारकाव्दारे घेण्यात आलेल्या नविन सुधारित करमुल्यांकनाबाबत आक्षेप अर्ज नोंदवही तयार करणे, सुनावनीस मिळकत धारकास आमंत्रित करण्याची नोटीस प्रिंट करुन देणे इत्यादी साहीत्य पुरवठा आवश्यक स्टेशनरी व बाईंडींगसह करणे. सुनावनी मध्ये घेण्यात आलेल्या निर्णयाप्रमाणे संगणक आज्ञावलीत अद्यावतीकरण करुन नगरपरिषदने दिलेल्या नमुन्यामध्ये अंतिम करमुल्यांकन यादी नगर परिषदला आवश्यक स्टेशनरीसह पुरविण्यात यावी.

**कंत्राटदाराने सादर करावयाची कागदपत्रे (लिफाफा क्र.१):-**

संकेत स्थळावर दिलेल्या जागेवर कंत्राटदाराने खाली नमुद केलेली कागदपत्रे लिफाफ्यामध्ये सादर करावित.

१) कंत्राटदाराने कंपनी लेटर हेडवर परिशिष्ठ “अ” नुसार पत्र सादर करावे.
२) १०० रु. च्या स्टॅप वर परिशिष्ठ “ब” प्रमाणे प्रमाणपत्र.
३) कंपनी नोंदणी प्रमाणपत्र.
४) संयुक्त उपक्रमाला परवानगी नाही.
५) मागील तीन वर्षाचा आयकर भरण्याचे प्रमाणपत्र.
६) जिएसटी प्रमाणपत्र.
७) ISO Certification
८) कर्मचारी भविष्यनिर्वाह निधी प्रमाणपत्र.
९) कर्मचारी विमा निगम प्रमाणपत्र.
१०) प्रत्यक्ष मिळकतीवर जाऊन प्रत्येक मिळकतीला विशिष्ठ क्रमांक नोंदविणे, मिळकतीवर जाऊन प्रत्येक मिळकतीचे आतुन मोजमाप करणे, करण्यात आलेल्या मालमत्तेच्या प्रत्यक्ष सर्वेक्षणाचे संगणकीय अद्यावतीकरण करुन माहीती तयार करणे, कर मुल्यांकन प्रक्रिये करिता मदत करणे, कर मुल्यांकन प्रक्रिये करिता आवश्यक नमुन्यात माहिती प्रिंट करुन आवश्यक स्टेशनरी व बाईंडिंगसह पुरविणे इत्यादी कामाकरिता सहाय्य करणे, इत्यादी कामे महाराष्ट्र राज्यातील किमान ०१ नगर पंचायत/ नगर परिषद किंवा महानगरपालिकाचे काम चालू व मागील वर्षात पूर्ण केल्याचा अनुभव असणे आवश्यक आहे
११) महाराष्ट्र राज्यातिल कोणत्याही नगर परिषद/ महानगरपालिका क्षेत्रातिल उच्च रिझोल्युशन एरिअल इमेज घेण्याकरिता आणि त्यावर प्रक्रिया करण्याकरिता एजन्सीने Unmanned Arial Vehicle (UAV) ड्रोन या तंत्रज्ञानाचा वापर करुन यापुर्वी

नगरपरिषद/नगरपंचायत किंवा महानगरपालिका यांनी यशस्वीरित्या काम चालू व मागील वर्षात पूर्ण केल्याचा अनुभव असणे आवश्यक आहे व ते बंधनकारक आहे. केलेल्या कामाच्या प्रमाणपत्रात मालमत्ता क्रमांक देणे इत्यादी उद्देशाने अशा तंत्रज्ञानाचा वापर आणि अमलबजावणी यांचा स्पष्ट उल्लेख असणे आवश्यक आहे.

१२) निविदादाराकडे वार्षिक देखभाल, दुरुस्ती व साहीत्य पुरवठा, नगरपरिषदमध्ये संगणक आज्ञावली पुरविणे, ती सुरळीतपणे काम करत असणे, मिळकत धारकांना घरुन कराचा भरणा करण्याकरिता ऑनलाईन सेवा पुरवणे व सध्यास्थितीत आज्ञावली सुरळीतपणे काम करत असल्याचा महाराष्ट्रातील महानगरपालिका किंवा नगरपरिषद/ नगरपंचायतचे काम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र असणे, चालू व मागील वर्षात पूर्ण केल्याचा अनुभव असणे आवश्यक आहे.

१३) निविदादाराकडे घरोघरी जाऊन लिपिकांनार्फत वसुली मोबाईल ॲण्ड्राईड/ वेब प्रणालीव्दारा करत आहे व सदर आज्ञावली चालु आर्थिक वर्षात सुरळितपणे चालु आहे. या प्रमाणे काम करत असल्याचे व काम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र महाराष्ट्रातील किमान ०१ महानगरपालिका किंवा  नगरपरिषद/ नगरपंचायतचे असणे आवश्यक आहे. वरिल प्रमाणे आज्ञावली चालू व मागील वर्षात पूर्ण केल्याचा अनुभव असणे आवश्यक आहे.

१४) निविदादाराचा ३ वर्षाची उलाढाल ही १ कोटी पेक्षा कमी नसावी.

१५) महाराष्ट्रातील नगरपरिषदव्दारे ही एजन्सी काळ्या यादीत समाविष्ट केलेली नसावी. असे आढळ्यास निविदादाराची निविदा रद्द करण्यात यावी.

१६) नगरपरिषद परंडा कार्यालया मध्ये येऊन चतुर्थ कर आकारणी करणे बाबत सादरीकरण करणे बंधनकारक राहील.

## IV) मुख्य निविदा पत्रक (लिफाफा क्र.२) :

निविदाकाराने निविदा सादर करतेवेळी विधेयके (BOQ) कुठलेही चुकी न होता सादर करावीत. BOQ मध्ये कुठलेही खोडताड नको. असे असल्यास BOQ रद्द केल्या जाईल. निविदाधारकाने निविदेमध्ये नमूद असणाऱ्या कामांसाठी एकत्रित प्रती मिळकत दर (GST व सर्व शासकीय करां शिवाय ई-निविदेच्या दरपत्रकामध्ये (BOQ) नमूद करणे गरजेचे आहे, त्याप्रमाणेच सादर करावे व आज्ञावलीचे  दर हे प्रति युनिट प्रमाणे टाकावे.

## V) ई-निविदा/ व्दी लिफाफा पध्दतीसाठी माहीतीपत्रक

सर्वप्रथम संकेत स्थळावर प्राप्त झालेल्या ई-निविदांचे लिफाफा क्रं.१ उघडुन त्यात असणाऱ्या सर्व कागदपत्राची छानणी करुन निविदाव्दारे सादर केलेली कागदपत्रे ही निविदा मध्ये मागितलेल्या कागदपत्रासह पडताळणी केल्या जाईल त्यामध्ये कुठल्याही कागदपत्रावर खोडखाड केलेली नसावी. मुख्याधिकारी यांच्या मार्फत कागदपत्राची पडताळणी केल्या जाईल व

मुख्याधिकारी यांना कुठलाही मुळ कागदपत्र हवा असल्यास ते निविदादारास सादर करावा लागेल. जर मुख्याधिकारी यांना कुठल्याही कागदपत्र खोटे आढळल्यास त्या निविदादारावर कायदेशिर कार्यवाही करुन काळ्या यादीत समाविष्ट केल्या जाईल. निविदाधारकाने डाऊनलोड केलेली ई-निविदा संकेत स्थळावर दिलेल्या निर्देशानुसार तसेच व्दी लिफाफा पध्दतीने ऑनलाईन जमा करावा. प्रस्तावाच्या प्रत्येक कागदपत्रावर निविदादाराच्या अधिकृत स्वाक्षरीकाराच्या स्वाक्षरी असणे आवश्यक आहे. निविदा सादर केल्यानंतर कोणत्याही निविदादारास सुधारणा, बदली करता येणार नाही.

VI) **निविदा उघडण्याची पध्दत :**

नगरपरिषदव्दारे प्रथम कागदपत्रांच्या लिफाफा उघडण्यात येईल. निविदेमध्ये दिलेल्या सर्व कागदपत्रे निविदादाराने सुपूर्द केलेली असावी.निविदाराने सादर केलेल्या सर्व कागदपत्रांची छाननी करून ई निविदा धारकांची संस्थेची पात्रता ठरविण्यात येईल. आवश्यकतेनुसार कोणतेही कागदपत्र नसतांना निविदादारास पात्र नसल्याचे मानले जाईल. व त्यांची निविदा विचारात घेतल्या जाणार नाही. सर्व निविदाकारांनी कामाच्या व्याप्ती मध्ये नमुद केलेले सर्व कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे. जर कागदपत्राची छाननी करतांना कुठलाही कागदपत्र नसल्यास निविदाकाराच्या निविदेस अपात्र ठरविण्यात येईल. ज्या निविदाकाराचे सर्व कागदपत्र योग्य असेल व कार्य व्याप्तीची पुर्तता केली असेल अशाचे धारकांचा लिफाफा क्र.२ उघडण्यात येईल. ज्या निविदाकांच्या लिफाफा २ उघडण्यात येईल त्यांच्यापैकी ज्या निविदाकाराचे दर सर्वात कमी असेल त्या निविदाकारास सदर निविदेकरिता पात्र ठरविण्यात येईल.

VII) **परंडा नगरपरिषदकडून धावते बिल रक्कम अदागयीचे टप्पे:-**

| **अ.क्र.** | **कामाचे विवरण** | **देयकाची टक्केवारी** |
|---|---|---|
| | **मिळकतीचे सर्वेक्षण करुन माहिती गोळा करणे** | |
| १ | नगर परिषद हद्दीतिल मिळकतीचे (इमारती व खुले भुखंड) पारंपारिक पद्धतीने प्रत्येक मिळकतीचे सर्वेक्षण करण्याकरिता नगरपरिषदेस सहाय्य करण्यात यावे. त्यामध्ये मा. मुख्याधिकारी यांनी दिलेल्या निर्देश व नियमांनुसार निविदा धारकांनी सामाजिक, आर्थिक सिमांकन, उच्चभाडे क्षेत्र, मध्यम भाडे क्षेत्र, कमी भाडे क्षेत्र, वाणिज्यीक, निवासी,झोपडपट्टी इत्यादीच्या आकलनाने नगर परिषद हद्दीतिल मिळकती (इमारती व खुले भुखंड) जुन्या व नविन मिळकतीचे प्रत्यक्ष स्थळावर जाऊन मिळकतीचे आतुन मोजमाप घेऊन मिळकतीचा अंतर्गत नकाशा तयार करणे. सर्वेक्षण करतांना करमुल्यांकनाकरिता आवश्यक असलेली माहिती इमारतीचे मजले, बांधकाम वर्ष, बांधकामाची रचना, बांधकामाचे क्षेत्र, करपात्र क्षेत्र, | १०० |

| | | |
|---|---|---|
| | शौचालय शिट संख्या इ. माहिती गोळा करणे व प्रत्येक मिळकतीचे सर्वेक्षणाचे विवरण पत्र तयार करणे व प्रत्यक्ष मिळकतीवर जाऊन प्रत्येक मिळकतीचे डीजिटल फोटो काढणे. काम पुर्ण केल्यानंतर. | |
| **प्रत्यक्ष मिळकतीवर जाऊन प्रत्येक मिळकतींना विशिष्ठ क्रमांक नोंदविणे** | | |
| १ | नगरपरिषद हद्दीचा भौगोलिक नकाश तयार करण्याकरीता नगरपरिषद हद्दीमध्ये UAV Drone उडवून मालमत्तांचे व जमिनीचे हवाई छायाचित्र काढून नगर परिषद हद्दीचा भौगोलिक नकाशा तयार करून देण्यात यावा, नकाशावर नगर परिषदची हद्द आखणी, कर विभागाकरिता प्रभागाची आखणी नकाशावर करुन देण्यात यावी,<br>प्रत्येक मिळकतीला क्रमांकन करण्याकरिता प्रत्यक्ष मिळकतीवर जाऊन प्रत्येक मिळकतीला विशिष्ठ क्रमांक देण्यात यावा, क्रमांकन करतांना मिळकतीची जुन्या व नविन मिळकतीची नोंदवही तयार करणे व प्रत्येक मिळकतींना नव्याने क्रमांकन करण्यात यावे. इ. काम पुर्ण केल्यानंतर व समाधान कारक असल्याची खात्री झाल्या नंतर | ८० |
| २ | नविन नंबरची आखणी भौगोलिक नकाशावर करून प्रभाग दर्शक नकाशा व संपुर्ण शहराचा नकाशा तयार करून नगरपरिषदेस सुपूर्द करणे, निवड करण्यात आलेल्या निविदा धारकामार्फत नगर परिषदला आवश्यक असलेला इतर माहिती जसे सोलार सुविधा, रेन वॉटर हार्वेस्टिंग सुविधा, लिफ्ट बाबत माहिती, विहिर, हातपंप, अग्नि सुरक्षा सुविधा,संबंधीत माहिती, नगर परिषद मधील कर विभाग प्रमुख यांच्या साह्याने नगर परिषद हद्दितिल उच्च भाडे क्षेत्र, मध्यम भाडे क्षेत्र, कमी भाड्याचे क्षेत्र ची आखणी नकाशावर करणे इ. काम पुर्ण केल्यानंतर व समाधान कारक असल्याची खात्री झाल्या नंतर | २० |
| **सर्वेक्षणाचे संगणकात अद्यावतीकरण व कर मुल्यांकनाकरिता साहित्य पुरवठा** | | |
| १ | निविदाकाराने कर आकारणी करण्याकरीता नगरपरिषदने निश्चित केलेल्या वार्डाप्रमाणे व मिळकतीप्रमाणे आज्ञावली अद्यावत करणे करमुल्यांकनाच्या प्रक्रीयेकरिता निविदाधारकाच्या सहाय्याने करण्यात आलेल्या मालमत्ता सर्वेक्षणाचा डाटा मिळकतीचे मजले, बांधकाम वर्ष, वापर, बांधकाम क्षेत्रफळ, करपात्र क्षेत्रफळ, खुल्या भुखंडाचे क्षेत्रफळ व या व्यतिरिक्त सर्वेक्षणादरम्यान गोळा केलेल्या माहितीचे संगणक आज्ञावलीत अद्यावतीकरण करणे. करण्याचे काम पुर्ण झाल्यानंतर. | ६० |
| २ | नगरपरिषदेद्वारे करमुल्यांकनाकरिता दरपत्रक किंवा भांडवलीमुल्य आकारणी करीता मुल्यांकन यादी पुरविण्यात येईल. याप्रमाणे करयोग्य मुल्य किंवा भांडवली मुल्य पद्धत या दोपैकी जी नगर परिषद सुचविल त्याप्रमाणे आकारणी करणे गरजेचे आहे. करमुल्यांकनाच्या कामाकरीता | |

| | | |
|---|---|---|
| | निविदादारामार्फत संगणक आज्ञावलीत अद्यावतीकरण झाल्यानंतर मा.मुख्याधिकारी ने सुचविल्याप्रमाणे व नियमाप्रमाणे प्रत्येक मिळकतींची मिळकत कर आकारणी पत्रक डिजिटल मिळकतीचा नकाशा, मिळकतींचा फोटोसह कलर प्रिंट काढुन नगर परिषदला सुपुर्द करणे, नगर परिषदने सुचविलेल्या नमुन्यामध्ये प्रारुप कर मुल्यांकन यादीचा पुरवठा केल्या नंतर. | २० |
| ३ | नगर परिषदने दिलेल्या नमुन्यामध्ये मिळकत धारकांना सुधारित करमुल्यांकनाबाबत पुर्वसुचना नोटीसेस कलर मध्ये पुरविण्यात येईल. सुनावणीकरिता मिळकत धारकाव्दारे घेण्यात आलेल्या नविन सुधारित करमुल्यांकनाबाबत तक्रार नोंदवही तयार करणे, सुनावनीस मिळकत धारकास आमंत्रित करण्याची नोटीस प्रिंट करुन देणे इत्यादी साहीत्य पुरवठा आवश्यक स्टेशनरी व बाईंडींगसह करणे. सुनावनी मध्ये घेण्यात आलेल्या निर्णयाप्रमाणे संगणक आज्ञावलीत अद्यावतीकरण करुन नगर परिषदेने दिलेल्या नमुन्यामध्ये अंतिम करमुल्यांकन यादी नगरपरिषदला आवश्यक स्टेशनरीसह पुरविण्यात यावी. | २० |

VIII) **सुरक्षाठेव :-**

कार्यादेशाच्यावेळी निविदेच्या होणाऱ्या एकूण रक्कमेच्या २% बँक गॅरंटी जमा करावी लागेल, सदर रक्कम काम पूर्ण होई पर्यंत राखून ठेवली जाईल व काम पूर्ण झाल्यास ६ महिन्यानंतर निविदा धारकाच्या मागणीनुसार अदा केली.

IX) **नगरपरिषद तसेच नगररचना विभागाकडून मंजूर निविदाधारकास पुरविण्यात येणारी माहिती :-**

१. नगरपरिषद हद्दितिल मिळकतींची यादी.
२. कर आकारणी करिता दर तक्ता.
३. नगर परिषदेस आवश्यक असलेली संपुर्ण प्रिंटीग स्टेशनरीचे नमुने.
४. ऑनलाईन वसुली प्रणाली करिता पेमेंट गेटवे नगर परिषदव्दारा पुरविण्यात येईल.
५. सर्व माहिती नगर परिषदेमध्ये संगणक वर टाकण्याकरिता व कर वसुली करिता आवश्यक असलेले सर्व हार्डवेअर पुरविण्यात येईल.

X) **बयाणा रक्कम व कालावधी**

ई-निविदा प्रीक्रियेत भाग घेण्यासाठी सोबत रुपये ५०,००० /- बयाणा रक्कम ऑनलाईन भरणे अनिवार्य आहे. मंजूर निविदाधारकांची बयाणा रक्कम कार्यादेश मिळाल्यानंतर निविदादारास परत करण्यात येईल.

XI) <u>कामाचा करारनामा</u>

मंजूर निविदाधारकाने विहित नमुन्यात शासकीय नियमाप्रमाणे मुद्रांक शुल्क भरून निविदेतील अटी व शर्तीनुसार करारनामा करून देणे बंधनकारक आहे.

## परिशिष्ठ "अ"

**प्रति,**

**मा. मुख्याधिकारी,**
**परंडा नगरपरिषद, परंडा .**

**विषय**: नगरपरिषद हद्दीतिल संपुर्ण मिळकतीना (इमारती व खुले भुखंड) प्रत्यक्ष मिळकतीवर जाऊन प्रत्येक मिळकतीला विशिष्ठ क्रमांक नोंदविणे, मिळकतीवर जाऊन प्रत्येक मिळकतीचे मोजमाप करणे, करण्यात आलेल्या मालमत्तेच्या प्रत्यक्ष सर्वेक्षणाचे संगणकीय अद्यावतीकरण करुन माहीती तयार करणे, कर मुल्यांकन प्रक्रिये करिता मदत करणे, कर मुल्यांकन प्रक्रिये करिता आवश्यक नमुन्यात माहिती प्रिंट करुन आवश्यक स्टेशनरी व बाईंडिंगसह पुरविणे इत्यादी कामाकरिता सहाय्य करणे, नगरपरिषदेस कर विभागाकरिता आवश्यक असलेली संगणक आज्ञावली पुरविणे.

**महोदय,**

मी खाली सही करणार ------ जाहीर करतो की -------------------- संस्थेच्या नावेवरील विषयांकित ई-निविदा खरेदी केली गेली असून मी ई-निविदेत नमुद केलेली कामे व कामाच्या अटी शर्तीचा अभ्यास करून सदरची ई-निविदा सादर करित आहे.

सदर कामी ई-निविदेत परंडा नगरपरिषदेने नमुद केलेल्या अटी व शर्ती मला मान्य असून त्या शर्तीनुसार काम करुन देण्याची जबाबदारी माझ्यावर राहील. त्यामध्ये दिरंगाई झाल्यास नगरपरिषद कडून होणा-या कारवाईस मी जबाबदार असेल.

**आपला विश्वासू**

ई-निविदा सादर करणा-या निविदाधारकाचे/ कंपनीचे/ संस्थेचे नाव
ई-निविदा संचावर सही करणा-या निविदाधारक अधिका-याचे संपूर्ण नाव:-
अधिका-याचा पदभार:-
पत्ता:

**परिशिष्ठ "ब"**

**(प्रतिज्ञापत्र)**

कारणे प्रतिज्ञापत्र लिहून देतो की, नगरपरिषद जाहिर ई- निविदा सुचना नुसार निविदेतील दर प्रती मिळकत दर इतर निविदाधारकांपेक्षा कमी असल्यास निवेदेतील कामे करणे आवश्यक आहे.

उपरोक्त कामाबाबत मी/ आम्ही याव्दारे असे नमुद करतो की महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायत व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १६(१) (आय) व कलम ४४ (१) (ब) मधील तरतुदीनुसार आम्हांस माहीत असल्यानुसार आम्ही गंभीरपणे नमुद करतो की, नगरपालिकेशी किंवा नगरपालिकेच्या अधिन किंवा नगरपालिकेत किंवा नगरपालिकेच्या वतीने करण्यात येणा-या संविदेमध्ये नगरपरिषदच्या कोणत्याही नगरसेवकाचा कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध किंवा आमच्याशी भागीदारी नाही.

परंतु महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायत व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १६(१) (आय) नुसार तरतुद केली असेल त्याच्या व्यतिरिक्त नगरपालिकेच्या आदेशावरुन कोणत्याही कामात किंवा नगरपालिकेशी किंवा नगरपालिकेच्या अधिन किंवा नगरपालिकेत किंवा नगरपालिकेच्या वतीने केलेल्या कोणत्याही संविदेत जिचा स्वत:चा किंवा आमच्या भागीदारामार्फत प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध असेल, तसेच महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायत व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ४४ (१) (ब) नुसार पालिका अधिनियमातील कलम १६ चे पोटकलम (३), खंड (ब), (क), (ई) व (ग) मध्ये वर्णन केल्याप्रमाणे त्याचा किंवा त्याच्या भागीदाराचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रितीने कोणत्याही हिस्सा किंवा हितसंबंध असेल, मग अशा हिस्स्याची किंवा हितसंबंधाची किंमत काहीही असो किंवा त्याच्या भागीदाराचा, प्रकर्त्याच्या (प्रतिनिधीचा) किंवा इतर व्यक्तीच्या वतीने व्यवसायिकदृष्ट्या त्याचा हिस्सा किंवा हितसंबंध असेल अशा कोणत्याही बाबतीत मतदान करील.
उपरोक्त प्रमाणे प्रतिज्ञापत्र लिहून दिले असे

दिनांक (कंत्राटदाराची सही)

Signature Not Verified
Digitally signed by Sondge Jagadeesh Subhash
Date: 2026.05.16 05:22:48 PDT
Location: Maharashtra-MH